नवीन माहिती तंत्रज्ञान प्रकल्पांशी (New IT Projects) संबंधित प्रस्तावास इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुध्दिमत्ता आयुक्तालयाच्या तांत्रिक समितीची मान्यता घेण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**इलेक्ट्रॉनिक्स,माहिती तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुध्दिमत्ता विभाग**

**शासन परिपत्रक क्र. PIC-२०२६/C.R.३४/IT (E-१५६३२८०)**

मंत्रालय, मुंबई- ४०००३२.

दिनांक:- ०९ जून, २०२६.

**संदर्भ** :- १) सामान्य प्रशासन विभाग (माहिती तंत्रज्ञान) यांचा शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-१७२५/प्र.क्र.२९९/मातं, दिनांक १८/११/२०२५.

२) माहिती तंत्रज्ञान संचालनालयाचे पत्र क्रमांक मातंस २०२५ /तां.मा./से-३/७५, दिनांक १९/१२/२०२५.

३) सामान्य प्रशासन विभाग (माहिती तंत्रज्ञान) शासन परिपत्रक क्र. PIC-२०२६/C.R.३४/IT (e-file १५६३२८०), दिनांक ०५/०३/२०२६.

**शासन परिपत्रक** :-

माहिती तंत्रज्ञानविषयक प्रकल्पांच्या रु. पाच कोटींपर्यंतच्या खर्चास मान्यता देण्याच्या अनुषंगाने मंत्रालयीन प्रशासकीय विभागाच्या स्तरावर विभागीय प्रकल्प अंमलबजावणी समित्या (PIC) गठीत करण्यात आल्या आहेत. या समित्यांच्या बैठकीपूर्वी विभागांच्या सर्व प्रकारच्या तांत्रिक प्रस्तावांची तांत्रिक तपासणी (Technical Scrutiny) माहिती तंत्रज्ञान संचालनालयाच्या तांत्रिक समितीकडून करून घेणे संदर्भाधीन क्रमांक ३ येथील परिपत्रकान्वये बंधनकारक करण्यात आले होते. तथापि, असे निदर्शनास आले आहे की, विभाग प्रकल्प अंमलबजावणी समितीचे (PIC) सर्व प्रस्ताव (तांत्रिक व अतांत्रिक) व संपूर्ण अजेंडा तांत्रिक समितीच्या पूर्व मान्यतेसाठी/अभिप्रायासाठी पाठवत आहेत. यामुळे तांत्रिक समितीच्या वेळेचा अपव्यय होतो व प्रस्तावांच्या तपासणीमध्ये सुध्दा विलंब होतो. ही बाब लक्षात घेऊन, संदर्भाधीन **दि. ०५ मार्च, २०२६ रोजीचे परिपत्रक अधिक्रमित करण्यात येत आहे.**

२. सदर पार्श्वभूमीवर सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांना सूचित करण्यात येते की, यापुढे प्रशासकीय विभागांमार्फ़त **फक्त नवीन माहिती तंत्रज्ञान विषयक प्रकल्पांशी संबंधित प्रस्ताव (Proposals related to New IT Projects)** तांत्रिक तपासणीसाठी (Technical Scrutiny) संदर्भ क्र. १ येथील दि.१८/११/२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आलेल्या इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुध्दिमत्ता आयुक्तालयाच्या (पूर्वीचे माहिती तंत्रज्ञान संचालनालय)

तांत्रिक समितीकडे पाठवावे. सदर प्रस्ताव हे दिनांक १८/११/२०२५ रोजीच्या मूळ शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या तरतूदी, नियम आणि निकषांनुसारच सादर केले जावेत. या व्यतिरिक्त कोणत्याही विभागाला माहिती तंत्रज्ञानाशी संबंधित कुठल्याही विशिष्ट तांत्रिक मुद्यावर इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुध्दिमत्ता विभागाच्या अभिप्रायाची आवश्यकता असल्यास ते प्रस्ताव तांत्रिक समितीकडे पाठविण्यात यावेत.

३. प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या कार्यकक्षेत येणारे इतर सर्व नियमित विषयावर विभागाची प्रकल्प अंमलबजावणी समितीने त्यांच्या स्तरावर आवश्यक निर्णय घेण्यात यावेत.

४. सर्व विभागांनी या शासन परिपत्रकान्वये देण्यात आलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

५. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक क्र. २०२६०६०९१७०१५१६९११ असा आहे. सदर शासन परिपत्रक डिजिटल स्वाक्षरीने स्वाक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

DURGAPRASAD
POCHAYYA
MYLAWARAM

Digitally signed by DURGAPRASAD POCHAYYA MYLAWARAM
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=EIT and AI, 2.5.4.20=F4FD0AC26AD2A365A8E829907C5E76B911FED9B1B9E48CC2854C4B8A14B0D70C, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=BEFBB0AE84804C4DA8D35ABF2195EBB1DC727DE9B0A094BEA77F4CA6BE5965DB, cn=DURGAPRASAD POCHAYYA MYLAWARAM
Date: 2026.06.09 17:02:59 +05'30'

**( दुर्गाप्रसाद मैलावरम )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा.मंत्री (इलेक्ट्रॉनिक्स,माहिती तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुध्दिमत्ता विभाग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) अ.मु.स./प्र.स./सचिव (सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग), मंत्रालय, मुंबई-३२.
३) सचिव, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुध्दिमत्ता विभाग यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
४) उप सचिव, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुध्दिमत्ता विभाग, मंत्रालय, मुंबई.
५) आयुक्त, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुध्दिमत्ता आयुक्तालय यांचे स्वीय सहायक, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुध्दिमत्ता आयुक्तालय,मुंबई.
६) निवडनस्ती/ Tech-०१